# साईन ऑफ फोर

**लेखक : आर्थर कॉनन डायल**

**अनुवाद : विवेक जोशी**

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**साईन ऑफ फोर : विवेक जोशी**

**© सुरक्षित**

समन्वय प्रकाशन
६७८ ई वॉर्ड, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**

अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**

रावजी देसाई

**मुखपृष्ठ**

चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**

श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**

मे, २०१२

**किंमत**

रुपये १६०/-

---

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

---

# साईन ऑफ फोर

**ऋणनिर्देश**

कै. भालबा केळकर
कै. गजानन क्षीरसागर
श्री. ह. आ. भावे
श्री. आनंद अंतरकर

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| होम्सचं निष्कर्षशास्त्र | ............. | ९ |
| नवे रहस्य | ............. | २० |
| रहस्याचा माग | ............. | २८ |
| रहस्यभेद? | ............. | ३५ |
| पाँडिचेरी लॉजमधील शोकनाट्य | ............. | ४९ |
| होम्सचं प्रात्यक्षिक | ............. | ५९ |
| टोबीनं लावलेला शोध | ............. | ७१ |
| बेकर स्ट्रीटचे गुप्तहेर | ............. | ८६ |
| दुवा निखळला | ............. | ९९ |
| अंदमानीचा मृत्यू | ............. | ११३ |
| आग्र्याचा खजिना | ............. | १२४ |
| जोनाथन स्मॉलची अद्भुतरम्य कहाणी | ............. | १३१ |


✦✦✦

# होम्सचं निष्कर्षशास्त्र

शेरलॉक होम्सनं मेंटल पीसच्या कोपऱ्यावरून आपली बाटली उचलली आणि नीटनेटकी ठेवलेल्या मोरॅक्को बॉक्सवरून सिरींज. आपल्या लांबसडक नाजूक थरथरत्या बोटांनी त्यानं सिरींजला सुई अडकवली. डाव्या हाताची बाही वर केली. काही क्षण त्याची नजर आपलं मनगट आणि कोपर यामधील हाताच्या दणकट भागावर खिळली. तिथे आधीच सुई टोचल्याच्या असंख्य खुणा होत्या. काही क्षण त्यानं विचार केला, हातात सुई खुपसली, सिरींजचा दट्ट्या दाबला आणि समाधानाचा सुस्कारा सोडून आपल्या खुर्चीत कोसळला.

गेले कित्येक महिने दिवसांतून तीन वेळा मी त्याचा हा कार्यक्रम बघत होतो तरीही अजून माझं मन त्यानं निर्ढावलं नव्हतं. उलट ते बघून माझ्या मनाचा तडफडाट होत होता. आपल्याला हे थांबवण्याचं धाडस कसं होत नाही या विचारानं माझं मन मला खात होतं. अनेकदा या मुद्यावर त्याची सणसणीत हजेरी घ्यावी असं मी मनाशी ठरवत असे पण त्याचा थंडपणा, उदासीनता बघून त्याच्या आचारस्वातंत्र्यावर गदा आणण्याचा धीर होत नसे. त्याची अफाट बुद्धिमत्ता, आदर्श वागणूक, माझ्या अनुभवास आलेले त्याचे अनेक आदर्शवत गुण यामुळे त्याला विरोध करणं मला कठीण जात असे.

त्या दिवशी दुपारी मात्र मी जेवताना घेतलेल्या मद्यामुळे किंवा त्याच्या वागण्यातील अतिरेकामुळे असेल पण माझ्या सहनशीलतेचा कडेलोट झाला आणि मी अखेरीस तोंड उघडलंच.

''काय घेतलंस आज,'' मी विचारलं, ''मॉर्फीन की कोकेन?''

त्यानं पुढ्यातल्या पुस्तकातून आपलं डोकं वर केलं आणि चडावलेल्या डोळ्यांनी माझ्याकडे बघितलं.

''कोकेन,'' तो म्हणाला, ''सात टक्के सोल्यूशन तुला घेऊन बघायचं आहे?''

''अजिबात नाही.'' मी तुसडेपणानं उत्तर दिलं. ''अजूनही माझी प्रकृती त्या अफगाणिस्तान मोहिमेनंतर सुधारलेली नाही आणि तिच्यावर जास्त ताण देणं मला परवडणार नाही.''

मी ज्या आवेशानं बोललो ते बघून त्याला हसू फुटलं. ''कदाचित तुझं म्हणणं बरोबर असेल वॅटसन,'' तो म्हणाला. ''त्याचे देहावर घातक परिणाम होतात हे मान्य पण त्यामुळे माझ्या मनावरचा ताण कमी होतो, ते शांत होतं. त्यापुढे ते देहावरचे परिणाम मला अगदी क्षुल्लक वाटतात.''

''पण जरा विचार कर!'' मी अगदी कळवळून बोललो. ''त्यासाठी तू किती किंमत मोजतो आहेस! तू म्हणतोस त्याप्रमाणे तुझ्या मेंदूला थोडीफार उत्तेजना मिळतही असेल पण त्याने देहावर किती घातक परिणाम होतात, कायमचा अशक्तपणाही येऊ शकतो. एखाद्या मेणबत्तीसारखं तू देहाला जाळीत आहेस. क्षणिक सुखासाठी तू तुला मिळालेल्या महान देणगीचा नाश का करून घेतो आहेस? मी हे केवळ दोस्त म्हणून बोलत नाही तर ज्याच्यावर एखाद्याच्या प्रकृतीच्या बऱ्यावाईटाची जबाबदारी आहे असा वैद्यकीय अधिकारी बोलतो आहे असं समज!''

माझ्या बोलण्याचं त्याला जराही वाईट वाटल्याचं दिसलं नाही. उलट त्यानं आपली बोटं जुळवली. कोपरं खुर्चीच्या हातांवर टेकली. त्याच्या एकूण आविर्भावावरून तो वादविवादासाठी तयार होत असल्याचं दिसलं.

''माझं मन,'' तो म्हणाला, ''रिकामपणाविरुद्ध नेहमीच बंड करून उठतं माझ्यासमोर एखादी समस्या ठेवा, काहीतरी काम द्या. एखादा गूढ संदेश द्या किंवा अत्यंत गुंतागुंतीचं प्रकरण द्या मग मी पुन्हा पूर्ववत होतो की नाही बघा. मग मी लगेच ही कृत्रिम उत्तेजकं फेकून देईन. मला माझ्या मनाला आनंद